

# ये है मेट्रोनॉमिक्स...

**२**०२४ पर्यंत मेट्रो ३ च्या प्रत्येकी आठ डब्यांच्या ३१ गाड्या धावणार असून, इतर मेट्रो मार्ग, मोनोरेल, उपनगरीय रेल्वे आणि एसटी बससेवांशी एकत्रित जोडणी या मेट्रोला दिली जाईल. विशेष म्हणजे उपनगरीय रेल्वेतील १५ टक्के प्रवासी मेट्रो ३ कडे वळतील. २०४१ पर्यंत मेट्रो ३ मुळे वाहनांच्या फेऱ्यांमध्ये प्रतिदिन ६.६५ लाखांनी घट होईल, असा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे.

## इन्फोग्राफिक

सचिन लुंगसे

आतापर्यंत मेट्रोच्या तीन गाड्या मुंबईत दाखल झाल्या असून, दोन गाड्या श्रीसीटी आंध्र प्रदेश येथील ऑस्तोम कारखान्यातून मुंबईकरिता रवाना झाल्या आहेत. १७ किंवा १८ मेपर्यंत या गाड्या मुंबईत दाखल होतील. यानंतर उर्वरित चार गाड्या प्रत्येक महिन्यांत दोन अशा मुंबईत दाखल होतील.

### भुयारी मार्ग : कुलाबा - वांद्रे - सीप्झ

- **किमी :** ३३.५ लांब
- **एकूण स्थानके :** २७, २६ भुयारी तर एक जमिनीवर
- **कुठे जोडणी :** उपनगरीय रेल्वेशी न जोडलेल्या काळबादेवी, गिरगाव, वरळी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांसारख्या भागांना.

### पहिला टप्पा : आरे ते बीकेसी

- **एकूण स्थानके :** १०, ९ भुयारी तर एक जमिनीवर
- **अंतर :** १२.४४ कि.मी.
- **दोन गाड्यांमधील कालावधी :** ६.५ मिनिटे
- **पहिल्या टप्प्यातील गाड्यांची संख्या :** ९
- **सेवेची चाचणी :** ऑक्टोबर २०२३ पर्यंत सुरू होणे अपेक्षित

### दुसरा टप्पा : बीकेसी ते कफ परेड

- **एकूण स्थानके :** १७
- **अंतर :** २१.३५ कि.मी.
- **दोन गाड्यांमधील कालावधी :** ३.२ मिनिटे
- **दुसऱ्या टप्प्यातील गाड्यांची संख्या :** २२
- **जून २०२४ :** हा मार्ग सुरू होणार

### मेट्रो मार्ग : ३ चा विस्तार

- **एकूण लांबी :** २.५ कि.मी.
- **स्थानकाची संख्या :** १ / नेव्हीनगर स्थानक
- **स्थानकाचे ठिकाण :** टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चजवळील डॉ. होमी भाभा रोड
- **खर्च :** २४०० कोटी
- नेव्हीनगरमधील ५० हजार लोकांना मेट्रोचा फायदा होईल.

